VOL- VIII ISSUE- VIII AUGUST 2021 PEER REVIEW e-JOURNAL IMPACT FACTOR 7.149 ISSN 2349-638x

# भारताच्या संसदिय राजकारणात विरोधी पक्षांची भुमीका आणि वाटचाल

**प्रा.डॉ.राजेंद्र दिलीप आगवाने**
*सहाय्यक प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,*
*गुरूवर्य मामासाहेब दांडेकर कला, भगवंतराव वाजे वाणिज्य व*
*विज्ञान महाविद्यालय, सिन्नर जि. नाशिक.*
*इमेल- rajendraagwane@gmail,com*

Abstract

*लोकशाही शासन व्यवस्थेत दोन किंवा त्यापेक्षा अधिक पक्षांचे अस्तित्व असते तेथील सार्वत्रिक निवडणूकीमध्ये ज्या पक्षाला बहुमत मिळते तो राजकीय पक्ष सत्ता संपादन करतो, अशा राजकीय पक्षाला सत्तारूढ पक्ष म्हणतात. तर त्यानंतरचे संख्याबळ ज्या राजकीय पक्षाला मिळते त्याला विरोधी पक्ष म्हणतात. इंग्लंडला लोकशाहीची जननी म्हणतात इंग्लंडमध्ये विरोधी पक्षाच्या विकासाचे मुळ राजा व प्रजा संघर्षात सत्तेचे समर्थन करणारा गट हुजूर तर राजाच्या सत्तेला विरोध करणारा गट व्हिग किंवा उदारमतवादी म्हणून ओळखण्यात आलेला गट विरोधी पक्ष होता. १९ व्या शतकात अमेरिकेत निग्रोच्या गुलामगीरीच्या प्रश्नावरून झालेले युध्द व त्यांच्या हक्कांचे समर्थन करणारा पक्ष तसेच साम्यवादाला विरोध करणारा पक्ष, उच्चवर्णीयांचे समर्थन करणारा पक्ष असे विविध पक्ष अस्तित्वात आल्याचे दिसून येते. फ्रांसमध्ये समाजवादी विचारांशी बांधीलकी मानणारा पक्ष दुसऱ्या बाजूला जमीनदार, उद्योगपती व उच्च मध्यम वर्गीयांचे हितसंबंध जपणारे प्रतिगामी पक्ष या आधारावर विरोधी पक्षाचा उदय आणि विकास झालेला आहे. भारत हा देश विविधतेने नटलेला आणि राष्ट्रीय एकात्मतेची जाण असलेला जगातील एकमेव वैशिष्टयेपुर्ण देश आहे, हे जाणून घटनाकारांनी भारतात बहुपक्ष पध्दतीचा स्विकार केला. यामुळे भारतात जे लोक अनेक धर्म, भाषा, जाती, प्रदेश इ. च्या प्रभावामुळे विविध विचारप्रवाह जोपासतात त्यांना भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल. आपल्या विचाराच्या पक्षाच्या प्रतिनिधीला निवडता येइल ही भावना त्यामागची होती. कायदेमंडळामध्ये ज्या पक्षाच्या सदस्यांचे बहुमत असते त्यांच्या हाती सत्ता सोपवली जाते. महाराष्ट्राच्या राजकारणात २०१९ विधानसभा निवडणूकीनंतर अनेक वर्षापासून परस्पर विरोधी असणारे शिवसेना- राष्ट्रवादी कॉंग्रेस-कॉंग्रेस पक्ष एकत्र येत सत्ता स्थापन केली. २०२१ च्या कालखंडात एकीकडे संपूर्ण जग कोरोनाशी लढत आहे व भारतात मात्र विरोधी पक्षाचे अस्तित्व कोठेही दिसत नाही.*

**प्रस्तावना**

**भा**रताला १५ ऑगस्ट १९४७ ला स्वातंत्र्य मिळाले आणि २६ जानेवारी १९५० पासून भारतीय राज्यघटना अमलात आली इंग्लंडप्रमाणेच भारतानेदेखील संसदीय शासनपध्दतीचा स्विकार केला. भारतीय संसदेची दोन सभागृहे लोकसभा कनिष्ठ सभागृह व राज्यसभा वरीष्ठ सभागृह, भारतात अनेक पक्षपध्दती आहे. प्रौढ सार्वत्रिक निवडणूकीत लोकसभेत ज्या पक्षाला बहुमत मिळते तो पक्ष सत्ताधारी होतो. तर ज्या राजकीय पक्षाला लोकसभेत कमीत कमी लोकसभेतील एकुण सदस्यांच्यापैकी कमीत कमी १० टक्के जागा मिळतात तो पक्ष विरोधी पक्षाची भूमिका बजावतो किंवा ज्या राजकीय पक्षाचे जास्तीत जास्त सदस्य विरोधी बाकावर असतील तो पक्ष विरोधी पक्षाची भूमिका बजावतो. जगातील कोणत्याही देशाच्या राजकीय, सामाजिक व अर्थिक विकासामध्ये राजकीय पक्षांची भुमीका अत्यंत महत्वाची असते. कारण राजकीय पक्ष म्हणजे विशिष्ट हेतु साध्य करण्यासाठी जनमतांचे संघटन करून, सनदशीर मार्गाने सत्ता स्थापन करणारा समुह होय. लोकशाहीमध्ये आणि विशेषत: भारतासारख्या बहुपक्ष पध्दत अस्तित्वात असणाऱ्या देशामध्ये लोक बहुमताने आपल्या विचारांशी

मिळतीजुळती विचारप्रणाली असणाऱ्या पक्षाच्या हाती सत्ता देतात. राजकीय पक्ष तो सत्ताधारी असो किंवा विरोधी तो राजकीय सामाजिकरण करतो, लोकांमध्ये सामाजिक व राजकीय जागृती निर्माण करून त्यांना गतीशिल बनवतो व राजकीय सहभाग वाढवण्यास मदत करतो, राजकीय संस्कृतीच्या विकासात योगदान देतो, नागरिकांचे हितसंबंध साध्य करण्यासाठी प्रयत्नशिल असतो अशा अनेक जबाबदाऱ्या राजकीय पक्ष पार पाडत असतात. एकपक्ष पध्दती या सर्वांना अपवाद असु शकते मात्र द्विपक्ष पध्दतीमध्ये एक सत्ताधारी तर दुसरा नियंत्रण ठेवणारा विरोधी पक्ष असतो. भारत हा देश विविधतेने नटलेला आणि राष्ट्रीय एकात्मतेची जाण असलेला जगातील एकमेव वैशिष्टयेपुर्ण देश आहे, हे जाणून घटनाकारांनी भारतात बहुपक्ष पध्दतीचा स्विकार केला. यामुळे भारतात जे लोक अनेक धर्म, भाषा, जाती, प्रदेश इ. च्या प्रभावामुळे विविध विचारप्रवाह जोपासतात त्यांना भाषण व अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा उपभोग घेता येईल. आपल्या विचाराच्या पक्षाच्या प्रतिनिधीला निवडता येइल ही भावना त्यामागची होती.

**अभ्यासाचा उद्देश**

१. भारताच्या संसदीय राजकारणातील विरोधी पक्षाच्या राजकारणाचा अभ्यास करणे.

२.विरोधी पक्षाच्या भूमिकेचा आणि वाटचालीचा अभ्यास करणे.

**गृहितक**

१. देशाच्या विकास प्रक्रियेत सत्ताधाऱ्याप्रमाणेच विरोधी पक्षाची भुमीका महत्वाची आहे.

२.विरोधी पक्षांची एकजुट दिसत नाही. पर्यायाने त्यांची लोकप्रियता कमी होत आहे.

**भारतातील प्रमुख विरोधी पक्ष त्यांचा कालखंड व विरोधी पक्षनेता**

१९५२ ते १९७७ कॉंग्रेस पक्षाचे निर्विवाद वर्चस्व प्राप्त झाल्याने या कालखंडात विरोधी पक्ष कमकुवत होते. १९५२ ते १९६७ या काळात कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया, १९६७ -६९ मध्ये स्वातंत्र्य पार्टी, १९६९-७७ संघटना कॉंग्रेस, १९७७-८० भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, १९७४-९० तेलगू देसम पार्टी, १९८९-९१ सर कालखंडात भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, १९९१-१९९६ भारतीय जनता पक्ष, १९९८-२००४ भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस, २००४-२०१४ भारतीय जनता पक्ष या राजकीय पक्षांनी विविधांगी विरोधी पक्ष म्हणून भूमिका बजावलेली दिसते. या कालखंडात विरोधी पक्ष सतत पर्यायी पक्ष म्हणून कार्यरत असतो त्यामुळे सरकार विरोधी पक्षांच्या अस्तित्वामुळे जनमताचा कानोसा घेत राज्य करत **असते**. विरोधी पक्षामुळे कायदेनिर्मीतीचे कार्ये उत्तमप्रकारे होते कारण सत्तारूढ व विरोधी पक्ष यांच्या कडुन विधेयकावर चर्चा, विचारविनिमय होउन योग्य व आवश्यक अशा कायद्यांची निर्मिती होत असते. सत्तारूढ राजकीय पक्षाच्या हुकुमशाही व अन्यायी वृत्तीला लगाम घालण्याचे कार्य विरोधी पक्ष करीत असतो.

| अ. क्र. | वर्ष | विरोधी पक्ष | लोकसभेतील विरोधी नेता |
|---|---|---|---|
| १ | १९५२–१९६७ | कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडीया | ए.के.गोपालन |
| २ | १९६७–१९६९ | स्वातंत्र्य पार्टी | एन.जी.रंगा |
| ३ | १९६९–१९७७ | संघटना कॉंग्रेस | राम शुभाग सिंग |
| ४ | १९७७–१९८० | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | वाय.बी. चव्हाण |
| ५ | १९८४–१९८९ | तेलगू देसम पार्टी | पी.उपेंद्र |
| ६ | १९८९–१९९१ | भारतीय | राजीव गांधी |

| | | | |
|---|---|---|---|
| | | राष्ट्रीय कॉंग्रेस | |
| ७ | १९९१–१९९३ | भारतीय जनता पक्ष | लालकृष्ण अडवाणी |
| ८ | १९९३–१९९६ | भारतीय जनता पक्ष | अटलबिहारी वाजपेयी |
| ९ | १९९६–२००४ | भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस | सोनिया गांधी |
| १० | २००४–२००९ | भारतीय जनता पक्ष | लालकृष्ण अडवाणी |
| ११ | २००४–२०१४ | भारतीय जनता पक्ष | सुषमा स्वराज |
| १२ | २०१४–२०१९ | अधिकृत विरोधी पक्ष नाही कारण कोणत्याही पक्षाने किमान १० टक्के जागा मिळवल्या नाहीत. | रिक्त |
| १३ | २०१४–२०१९ | | रिक्त |

संदर्भः- विकीपेडीया

वरील सर्व विवेचनावरून असे म्हणता येईल की, स्वातंत्र्यानंतरच्या काळात भारतीय राजकारणात दोन विचारांच्या कुटुंबातून म्हणजेच कॉंग्रेसमधून उदयाला आलेले पक्ष समाजवादी पक्ष, संयुक्त समाजवादी, प्रजा समाजवादी, भारतीय क्रांती दल, संघटना कॉंग्रेस आर., हे कॉंग्रेसमधून फाटाफुट हाउन उदयाला आलेले होते. तर १९७७ मध्ये जो जनता पक्ष स्थापण झाला त्या जनता कुटुंबातून भा.ज.प., जनता दल, लोकदल, समाजवादी पार्टी, राष्ट्रीय जनता दल, समता पार्टी, बिजु जनता दल, यांच मुळ जनता पक्षात आहे.

## १९९० नंतरचे राजकारण व विरोधी पक्ष

२०१४ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणूकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी लाटेवर स्वार झालेल्या भारतीय जनता पक्षाने लक्षणीय विजय मिळविला. तब्बल तीस वर्षानंतर भारताच्या संसदीय राजकारणात एखाद्या पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले होते. १९९० नंतर भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेस या पक्षाची पडझड सुरू झालेली होती कारण राजीव गांधी यांच्यानंतर सोनिया गांधी या नेतृत्वाचा स्विकार करण्यास भारतीय जनता नाराज होती, हा पक्ष अंतर्गत गटबाजीने ग्रासलेला होता, करिष्माई नेतृत्वाचा अस्त झालेला होता, स्पष्ट बहुमत नसल्याने अनेक गट बाहेर पडुन स्वतंत्र पक्षाची स्थापना करीत होते. यादरम्यानच भारतीय जनता पक्ष बाळसे धरत होता. १९८० मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या पक्षाने १९९० नंतर विकासाच्या राजकारणाच्या ऐवजी अस्मितालक्षी राजकारणास केंद्रीभुत मानुन मंदीर, मार्केट आणि मंडल या तीन मुद्याभोवती केंद्रीत केले त्यासाठी लालकृष्ण अडवाणी यांनी देशभर रथ यात्रेला सुरूवात करून व ६ डिसेंबर १९९२ रोजी आयोध्य येथे राममंदीराच्या उभारणीचा मुददा उपस्थित करून व कारसेवकांच्या धार्मिक भावना भडकावून, कारसेवकांनी बाबरी मश्जिद पाडण्यात आली पर्यायाने देशभरामध्ये हिंदु मुस्लिम यांचे ध्रुवीकरण होउन समाजामध्ये मोठया प्रमाणात हिंसाचार घडुन आला. दुसरे म्हणजे १९९१ मध्ये भाजपाने जागतिकीकरणाचे जोरदार समर्थन केले होते ज्यामुळे मुक्त अर्थव्यवस्थेचा स्विकार केल्याने ग्राहक व्यापारी व मध्यम वर्ग याना मोठा फायदा होईल असा त्यांचा दावा होता मात्र त्यामुळे भारतीय आणि पारंपारिक उद्योगांवर विपरित परीणाम झाला. तिसरे म्हणजे न्या. पी.बी. मंडल यांच्या अध्यक्षतेखाली भारतातील इतर मागास जातींना आरक्षण देण्यासाठी आयोगाची स्थापणा केली होती त्यामुळे आरक्षण केंद्रित राजकारणाचा उदय झाला त्याला भाजपाने पाठींबा

दिला, या सर्वांचा परिपाक म्हणून १९९६ मध्ये भाजपा सत्तेवर आले.

अस्मिता हा राजकीय संघटनांचा पाया बनला की राजकीय स्पर्धेला आणि वादाला भावनिक क्षोभाचा परिणाम लाभते. यात सतत आपला समुह व त्यांच्यावर कुरघोडी करणारा दुसरार समुह किंवा त्यांच्याकडे दुर्लक्ष्य करणारी राजकीय व्यवस्था निर्माण होत असते. यात संवाद, देवाणघेवाण आणि सहिष्णूता याबददल तुच्छतेची भावना असते. १९९८ मध्ये भारताने केलेली अणूचाचणी ही विरोधकांचे लक्ष्य ठरली होती कारण त्यामुळे भारताची आंतरराष्टीय प्रतिमा मलिन झाल्याचा आरोप केला जात होता. १९९६ ते २००४ या कालखंडात भाजपा सत्तेवर होता त्याला विरोध करून त्याचा जमातवादी, भांडवलवादी, भ्रष्टाचारी पक्ष, ब्राम्हणकेंद्रित पक्ष अशा अनेक बहुरूपी विद्रुप चेहरा जनतेसमोर आणण्याचे कार्य कॉग्रस व इतर विरोधी पक्षांनी केलेले होते. २००४ मध्ये विरोधकांना यश आले व सत्तांतर झाले कॉग्रस व मित्रपक्षांनी मनमोहन यांच्या नेतृत्वाखाली मिळुन सरकार स्थापण केले. मनमोहनसिंग यांनी केलेला भारत अमेरिका अणूकरार, संसदेमध्ये सापडलेली नोटांची बंडले, मनमोहनसिंग यांचे मौन सोनिया गांधी यांचा हस्तक्षे, महागाइ, भ्रष्टाचाराची प्रकरणे, आण्णा हजारे, केजरीवाल व रामदेवबाबा यांची आंदोलने, युपीय आघाडीतील मतभेद इत्यादी अनेक कारणांमुळे सुषमा स्वराज विरोधी पक्षनेता असलेल्या भारतीय जनता पक्षाने कॉग्रेसला धोबीपछाड केले व २०१४ मध्ये सत्तापरिवर्तन झाले २००४ ते २०१४ या काळात विरोधी पक्षाची भुमिका बजावणारा भाजप सत्ताधारी पक्ष बनला.

**प्रबळ विरोधी पक्षांचा आभाव व सत्तधाऱ्यांचं वर्चस्वशील राजकारण**

२०१४ मध्ये भाजपाचे नरेंद्र मोदी स्पष्ट बहुमताने सत्तेवर आल्यानंतर आश्वासनांचा पाउस भारतीय जनतेवर सुरू झाला. भारताच्या इतिहासात प्रथमच कोणत्याही एका पक्षाकडे विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळेल एवढे संख्याबळ नव्हते किमान ५५ सदस्य असणे आवश्यक होते त्यासाठी कॉग्रेसचे ४४ व आणा द्रमुकचे ३७ असे विरोधी पक्षांची युती होउन मल्लीकार्जुन खर्गे विरोधी पक्षनेते बनले . याच दरम्यान राहूल गांधी भाजपाच्या विरोधी आपली ओळख निर्माण करण्याचा प्रयत्न करत होते. नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेल्या प्रधानमंत्री जनधन योजना, मनरेगा, प्रधानमंत्री उज्वला योजना, प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना, जन औषधी योजना, स्वच्छ भारत अभियान इत्यादी योजना विरोधकांच्या चर्चेचा विषय बनल्या प्रत्यक्ष जनतेला मात्र कोणाताही फायदा यातून होणार नाही हा विश्वास विरोधकांचा होता. मोदींचा एक महत्वाचा निर्णय म्हणजे डिसेंबर २०१६ मध्ये घेण्यात आलेला पाचशे व एक हजाराच्या नोटा बंदी याला सर्जिकल स्ट्राईक असे नाव देण्यात आले होते. याला सर्व विरोधकांनी तात्पुरता पाठींबा दर्शवला होता परंतु बॅंकातील लांबच लांब रांगा, चलन तुटवडा व त्यामुळे ठप्प झालेले व्यवहार, मार्केटमध्ये मागणी व पुरवठा जास्त झाल्याने नाशवंत शेतमालांचे भाव झपाटयाने खाली येउन मातीमोल झाले त्यामुळे शेतकरी नाराज, व्यापारी वर्ग नाराज, पैसा हाताशी नसल्यने ग्राहक वर्ग नाराज त्यामुळे मोठा परिणाम स्थानिक निवडणूकीत भाजपाला भोगावा लागेल असे विरोधकांनी प्रतिपादन केले. विरोधकांच्या मते आमचा नोटाबंदीला विरोध नसून पर्यायी चलन पुरवठा सुरळीत नसल्याने अनेकांच्या जिवीतहानी सोबतच मनस्ताप यास सामोरे जावे लागत आहे. मोदींनी परदेशातून काळा पैसा आणण्याचे आश्वासन दिलेले होते मात्र ते पाळले नाही असा दावा केला जातो तसेच नउ हजार कोटींचे कर्ज बुडवून परदेशात पळुन गेलेल्या विजय मल्या यास कर्जमाफी देण्यात आली हा विरोधकांना विषय मिळाला.

आजपर्यंत असणारा विरोधी पक्ष जर सत्ताधारी बनला तर मागील सरकारने ज्या धोरणांची

आखणी केलेली होती त्यांना केराची टोपली दाखवली जाते. पुर्वी झालेले निर्णय चुकीचे असुन ते निर्णय एकतर रद्द केली जातात कींवा त्या कामावर जैसे थे चा आदेश आणून प्रकल्प बंद पाडले जातात. एवढेच नव्हे तर कॉन्ट्रक्टर बदलले जातात. पुन्हा निविदा काढल्या जातात, निधी अडवला जातो. बहुतेक सर्वच मंत्री झाल्यानंतर सचिवालयातील नको असलेल्या अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या जातात, गुन्हेगारांची सुटका केली जाते. रिझर्व बँक ऑफ इंडीयाचे गव्हर्नर बदलले जातात, नियोजन आयोगाचे नाव बदलून निती आयोग केले जाते, विरोधी पक्षांचे सरकार असणाऱ्या घटकराज्यामध्ये झालेल्या निर्णयांना कोर्टाचे आदेश आणून चुकीचे ठरवले जातात.

आता होत असलेल्या विकास कामांचे श्रेय लाटण्यावरून राजकीय पक्षांमध्ये स्पर्धा लागलेली दिसुन येते. छ. शिवाजी महाराजांचे मुबई येथे होणारे जागतिक दर्जाचे स्मारक बांधण्यासाठी मोदींच्या हस्ते उदघाटन झाले मात्र कॉग्रसचा दावा हा आहे की या स्मारकाची कल्पना आमची होती त्यामुळे भाजपाने त्याचे श्रेय घेउ नये. कोकणामध्ये होणारा जैतापुर अणूउर्जा प्रकल्पास शिवसेना सह डाव्या पक्षांनी विरोध दर्शवला होता. तसेच समृध्दी महामार्ग त्याच्या जमीन अधिकरणास मोठा विरोध होत आहे.

## अनियंत्रित सत्तेला नियंत्रित करण्यासाठी विरोधकांची गरज

भारताच्या संसदीय राजकारणात जेवढे महत्व सत्ताधाऱ्यांना आहे तेवढेच महत्व विरोधी पक्षांनादेखील आहे. विरोधकांचे संख्याबळ जर ४० टक्यापेक्षा अधिक असेल तर सत्ताधारीवर एक नियंत्रण प्रस्थापीत होत आणि जर विरोधकांचे संख्याबळ कमकुवत असेल तर सत्ताधारी मनमानी कारभाराकडे वाटचाल करतांना दिसतात. २०१४ च्या निवडणूकीत मोदी सरकारला स्पष्ट बहुमत मिळाल्यामुळे भारताची वाटचाल हुकुमशाहीकडे किंवा मनमानी कारभाराकडे होत असतांना दिसत आहे लोककल्यानाच्या नावाखाली सर्वसामान्य माणसावर अनेक निर्णय थोपवले जात आहेत त्याचा विरोध करण्याइतपतही विरोधी पक्षांची एकजूट होत नाही सत्ताधारी पक्षाच्या विरोधात संघटीत विरोध उभा करण्यात राहूल गांधी अपयशी ठरले आहेत. नोटबंदीच्या विरोधात सगळया विरोधी पक्षांना एकत्र येण्याचे त्यांनी केलेले आवाहन सपशेल फसले आहे. मात्र नोटबंदीमुळे जे भयंकर परिणाम पुढे आले त्याला विरोध करण्यासाठी विरोधकांनी खरेच एकत्र येणे गरजेचे आहे. आजकाल राजकारण सर्वोच्य उदीष्ट हे केवळ स्वतःच्या स्वार्थी हितसंबंधासाठी केले जात आहे त्यामुळे ज्याप्रमाणे सत्ताधाऱ्यावर भ्रष्टाचाराचे आरोप लावले जातात त्याप्रमाणेच विरोधकांच्या नैतिकतेर प्रश्न उभे होतात. विरोधक हे जोपर्यंत सत्तेबाहेर आहेत तोपर्यंत जनतेच्या प्रश्नाबददल अतिशय पोटतिडकीने व कळवळीने ते हाताळतात मात्र तेच एकदा सत्तेत गेल्यानंतर मात्र त्यांच्या जनतेविषयीचा कळवळा बोथट होतो.

**निष्कर्ष:-**

२०२१ च्या कोरोना कालखंडात सत्ताधारी आणि विरोधी पक्ष यांची भूमिका एकसमान महत्वाची आहे. महाराष्ट्र आणि केंद्र सरकार यांचा विचार करता दोन्ही ठिकाणी परस्पर विरोध असणारे सरकार असल्याने योजना, लसीकरण, वस्तू व सेवांचे वितरण करतांना केंद्र सरकार भेदभाव करते आहे असे महाराष्ट्रातील सत्ताधारीं म्हणजेच केंद्रातील विरोधकांना वाटते. १९९० नंतरच्या कालखंडात पक्षीय राजकारण आणि सत्ता स्पर्धा यामध्ये विरोधकांची नैतिकता हरवलेले राजकारण उदयास येत आहे मुल्य किंवा तत्व नसलेले राजकारण उदयास आले आहे घटनाबाहय व जनहीताच्या विरोधी असणाऱ्या धोरणांचा विरोध कमी प्रमाणात होतांना दिसतो मात्र केवळ विरोधासाठी विरोध आणि चांगले निर्णय अपयशी ठरवीण्यासाठी सर्वोतोपरी प्रयत्न होतांना

दिसतात. विकासाच्या राजकारणात आणखी दूसरा महत्वाचा मुददा पुढे येतो तो म्हणजे विकासकामाचे श्रेय प्रतिपक्षाला मिळू न देणे किंवा विकासप्रकल्प हा आमच्याच सरकारच्या काळात झालेला आहे हेही विरोधक जनतेला सांगण्यास विसरत नाहीत. चौथा मुद्दा म्हणजे थोडया सकारात्मक दृष्टीने आहे तो असा की सत्ताधाऱ्यांवर वचक किंवा नियंत्रण ठेवण्यासाठी विरोधी पक्ष प्रबळ असणे आवश्यक आहे मात्र १६ व्या लोकसभेत प्रथमच विरोधी पक्ष म्हणून मान्यता मिळविण्यासाठी दोन पक्षांना युती करावी लागत आहे विरोधकांचे बळ तोकडे पडत असल्यामुळे सत्ताधारी वाट्टेल त्या पध्दतीने व्यवस्था बदल आणि निर्णय घेण्याचे प्रयत्न करत आहे पर्यायाने या गोष्टी लोकशाहीला मारक आहेत. संसदीय राजकारणात विरोधकांच्या अस्तित्व नाकारून चालणार नाही.

**संदर्भः-**


1. सुहास पळशीकर, २००९, समकालीन भारतीय राजकारणचे विश्लेषण, कॅस, पुणे.
2. सुहास पळशीकर, २००७,महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष, समकालीन, पुणे
3. सुहास पळशीकर, २००९,भारताच्या राजकारणाचा ताळेबंद, कॅस, पुणे.
4. तुकाराम जाधव २०१५ वार्षिकी २०१५ भारत, युनिक अकादमी, पुणे.
5. भारतीय गणराज्याचे शासन आणि राजकारण, डॉ. भा.ल.भोळे.
6. आधुनिक राजकीय विचारप्रणाली, डॉ.पी.डी. देवरे.
7. अग्रलेख दैनिक सकाळ, महाराष्ट्र टाइम्स, लोकसत्ता.